२७१

महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा सहसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक:- अशैसं-२०१४/प्र.क्र.०९/का-५, दिनांक :- ०९/०१/२०१५

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

सेंट मेरी एज्युकेशन हेल्थ अँड मल्टीपर्पज सोसायटी, मोहन नगर, नागपूर या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक ( ख्रिश्चन ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.१२/१२/२०१४ रोजी अर्ज सादर केला होता. दि.०९.०१.२०१५ रोजी माझ्या सक्षम संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरी करणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दिनांक २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक ( ख्रिश्चन ) अल्पसंख्याकांमधील व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचलित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक ( ख्रिश्चन ) अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचलित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विधिग्राह्य असेल. संबंकधत संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि. २७.०५.२०१३ अन्वये विहीत करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

(अैनुल अत्तार)
सक्षम प्राधिकारी तथा सह सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

Principal
St. Mary's School
Bhandara.

Principal
St. Mary's School
Bhandara.
CBSE : AFF : No. 1130570

Manager
ST. Mary's School
Kahat Road, Bhandara.